# मुंबई मेट्रो-३ मध्ये अखंडित इंटरनेट सेवा

मुंबई - देशातील सर्वात लांब भूमिगत मेट्रो रेल-३ या प्रकल्पात मुंबईतील २६ स्थानकांपैकी केवळ एक स्थानक वगळता सर्व स्थानके जमिनीखाली आहेत. विशेष म्हणजे जमिनीखाली १८ ते २० मीटर खोल धावणाऱ्या या मेट्रोमध्ये मोबाईल इंटरनेट सेवा मिळणार आहे. इंटरनेट सेवेमुळे मेट्रो रेल-३ च्या प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. सौदी अरेबियातील रियाध शहरात स्थित असलेल्या एसीईएस या कंपनीच्या एसीईएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीला कंत्राट देण्यात आले आहे.